Postal Regd.No. THC/262/2023-2025

E Mail : nisargchakra2001@gmail.com

# निसर्ग चक्र

संपादक: शिवम राजेंद्र वखरे

⋆ NISARG CHAKRA ⋆ RNI.No. MAHMAR/2022/83338 ⋆

कार्यकारी संपादिका : सौ.सिमा राजेंद्र वखरे


वर्ष : ०२ ★ अंक : ४० ★ मराठी साप्ताहिक ★ पाने : ४ ★ कल्याण, जि. ठाणे ★ मंगळवार, दि. ०९ एप्रिल ते १५ एप्रिल २०२४ ★ मूल्य : रु ५.००/- ★ आर.एन.आय.नं. एमएएचएमएआर /२०२२/८३३३८

Vol : 02 ⋆ Issue : 40 ⋆ Marathi Weekly ⋆ Pages : 4 ⋆ Kalyan, Dist Thane ⋆ Tuesday, Date : 09 April To 15 April 2024 ⋆ Price 5.00/- Mob. 9987496136 / 9619630035

## महाराष्ट्र लोकसेवा आयोग लवकरच सुधारित परिक्षांच्या तारखा जाहीर करणार

**मुंबई** : सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण विचारात घेऊन नव्याने आरक्षण निश्चिती करून लवकरच सुधारित परिक्षांच्या तारखा जाहीर करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने कळविले आहे.राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधि नियम, २०२४, दि.२६ फेब्रुवारी, २०२४ मधील तरतुदीनुसार दि.२६ फेब्रुवारी, २०२४ पूर्वी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत, जाहिरात प्रसिद्ध होऊन अर्ज मागविण्यात आलेले असून निवड प्रक्रिया सुरु झालेली नाही, अशा प्रकरणी शासना कडून सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण विचारात घेऊन नव्याने आरक्षण निश्चिती करून घेणे गरजेचे आहे व त्याप्रमाणे मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना कळ विण्यात आले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२४ करिता दिनांक२९ डिसेंबर, २०२३ रोजी विविध संवर्गातील एकूण २७४ पदांकरीता जाहिरात क्र.४१४ /२०२३ प्रसिद्ध करण्यात आली होती. ही परीक्षा दिनांक २८ एप्रिल, २०२४ रोजी घेण्यात येणार होती. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधि नियम,२०२४, दि.२६ फेब्रुवारी,२०२४ अंमलात आल्याने या अधिनियमातील तरतुदी विचारात घेता आयोगा च्या दि.२१ मार्च, २०२४ रोजीच्या प्रसिद्धी पत्रका द्वारे महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ दि.१९ मे, २०२४ रोजी नियोजित समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधि नियम,२०२४, दि.२६ फेब्रुवारी,२०२४ मधील तरतुदीनुसार दि.२६ फेब्रुवारी ,२०२४ पूर्वी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत किंवा जाहिरात प्रसिद्ध होऊन अर्ज मागविण्यात आलेले आहेत. तथापि, निवड प्रक्रिया सुरु झालेली नाही, प्रकरणी शासनाकडून सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण विचारात घेऊन नव्याने आरक्षण निश्चिती करून घेणे गरजेचे आहे व त्याप्रमाणे मागणीपत्र पाठविण्या बाबत शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यात आले आहे. महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, २०२४ करिता शासनाच्या महसूल व वन विभाग, वित्त विभाग, सामान्य प्रशासन विभाग, ग्राम विकास विभाग, आदिवासी विकास विभाग, उद्योग उर्जा व कामगार विभाग, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग इत्यादी विभागांकडून विविध गट-अ व गट-ब राजपत्रित संवर्गाकरिता प्राप्त मागणीपत्रामध्ये अराखीव पदांचा समावेश असल्याने, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण विचारात घेऊन सुधारित मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनाच्या संबंधित विभागास कळविण्यात आले आहे. सुधारित मागणीपत्र आयोगास प्राप्त होण्यास किती कालावधी लागेल याबाबत निश्चितता नसल्याने सध्या परिक्षेची सुधारित तारीख जाहीर करता येत नाही. प्रस्तुत परीक्षेतील सर्व संवर्गाकरिता प्रशासकीय विभागाकडून सुधारित मागणी पत्र प्राप्त झाल्यानंतर परिक्षेच्या पूर्व तयारीकरिता पुरेसा काला वधी देऊन तसेच संघ लोक सेवा आयोग व कर्मचारी चयन आयोग मार्फत आयोजित स्पर्धा परीक्षेचे दिनांक विचारात घेऊन परिक्षेचा सुधारित दिनांक आयोगा मार्फत जाहीर करण्यात येईल.

## गुढीपाडव्याचे औचित्य साधून पावन भूमी चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे गरजूंना जीवनोपयोगी राशन किटचे वाटप



**डोंबिवली** : 'चला पेटवू या दिवे,ज्या ठिकाणी अजूनही अंधार आहे' हे ब्रीद वाक्य घेऊन पावन भूमी चॅरिटेबल ट्रस्ट, कल्याण ही सामाजिक ट्रस्ट गेल्या अकरा वर्षापासून विविध सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. २३एप्रिल २०२४रोजी ट्रस्ट अकरावा वर्धापन दिन साजरा करीत आहे. म्हणून ट्रस्टच्या मार्फत दि.१४ फेब्रुवारी २०२४ पासून ते ८ एप्रिल पर्यंत ९० कुटुंबांपर्यंत राशन कीटचे वाटप करण्यात आले.हि ट्रस्ट प्रामुख्याने आदिवासी गोरगरीब कुटुंबांना समुपदेशन व आवश्यक वस्तूंचा पुरवठाकरीत असते. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रासह व्यसनमुक्ती, बाल संगोपन,कुपोषण, महिलांच्या आरोग्याचे विविध असे प्रश्न हि ट्रस्ट सोडवत असते. गरजू गरीब कुटुंबांना राशन किटचे वाटप दि. १४फेब्रुवारी २०२४ पासून ३० एप्रिल २०२४ पर्यंत ट्रस्टतर्फे आणखी गरजू कुटुंबांना राशन कार्ड चे वाटप करण्यात येणार आहे. मुख्य विश्वस्त राजेंद्र वखरे व ट्रस्टी सौ .सीमा वखरे तसेच स्वयंसेवकांनी गरजू कुटुंबांचा सर्वे करून घरपोच त्यांना गहू ,तांदूळ ,तेल, साखर, तूर डाळ, हरबरा डाळ इ. कीटचे वाटप केले. ३० एप्रिल २०२४ पर्यंत १२५ कुटुंबांपर्यंत रेशन किट वाटप ट्रस्ट तर्फे करण्यात येणार असल्याचे मुख्य विश्वस्त राजेंद्र वखरे यांनी सांगितले.

★★★

## अर्ध्या रात्री जबरदस्तीने घराबाहेर काढून डोंबिवलीत रहिवाशांच्या घरावर फिरवला बुलडोझर

**डोंबिवली**: (निसर्ग चक्र न्यूज) डोंबिवली शहराच्या पूर्व भागातील टाटा लाईन येथील नागरिकांना रात्री दोन वाजता घराबाहेर काढून त्यांच्या घरावर बुलडोजर फिरवण्याची घटना समोर आली आहे.

**डोंबिवली ईस्ट नियर कस्तुरी प्लाझा येथे आधुनिकृतणे रात्री तीनच्या सुमारास बुलडोझर लावून ६/७ घरे पाडण्यात आली आहे. त्यांची कोर्टात केस चालू आहे कोर्टाने कोणताही प्रकारचा निकाल घोषित केला नाही असे रहिवाशांचे म्हणणे आहे. त्यांची जबरदस्तीने घरे पाडण्यात आली आहे**

या प्रकरणी नागरिकांनी रामनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. या घटनेमुळे एकच खळबळ उडाली आहे. टाटा लाईन परिसरात राहणारे लोक आपल्या घरात झोपले असतांना त्यांना रात्री दोन वाजताच्या सुमारास लोकांच्या बोलण्याचा आवाज ऐकू आला. म्हणून ते झोपेतून जागे झाले. व ही लोकं का आली आहेत ?व कोण लोक आले आहेत हे पाहण्या साठी काही रहिवाशी घराबाहेर पडले. घराबाहेर काही लोकं आलेले असल्याचे त्यांना दिसले. त्यांच्या हातात धारदार शस्त्र होती. लाकडी दांडकेही होते लोकांनी त्यांना काय झाले ? कशासाठी आलात ?हे विचारण्या पूर्वीच त्यांना घरातून जबरदस्तीने बाहेर काढण्यास सुरुवात केली व त्यांनी सोबत बुलडोझरही आणला होता नागरिकांचा विरोध न जुमानता त्या ठिकाणी सहा ते सात घरांवर बुलडोझर फिरवला. व




रहिवाशांना बेघर केले या घटनेमुळे त्या ठिकाणी रात्री एकच गोंधळाची परिस्थिती उद्भवली होती. नागरिकांनी पोलिसांना संपर्क साधला असता त्या ठिकाणी पोलीस तात्काळ पोहचले. पीडित कुटुंबांपैकी नंदू माने यांनी सांगितले की बिल्डरने एका व्यक्तीला हाताशी धरून आम्हाला अर्ध्या रात्री घरातून जबरदस्तीने बाहेर काढत आमची घरे जमीनदोस्त केली आहे आम्ही अशा परिस्थितीत कुठे जाणार? आणि कुठे राहणार? असा प्रश्न आमच्या समोर आहे पोलिसांनी घरे पाडणाऱ्यांवर कारवाई करावी व आम्हाला न्याय द्यावा. यासंदर्भात रामनगर पोलिसांनी सांगितले की आमच्या कडे या प्रकरणी तक्रार प्राप्त झाली असून चौकशी सुरु आहे.

## समाधानकारक कामगिरी करणाऱ्या म्युच्युअल फंडांची संख्या इतकी कमी कशी?




लार्जकॅप फंड गटाची १ एप्रिल २०२३ ते २८ मार्च २०२४ या सरलेल्या आर्थिक वर्षातील कामगिरी तपास ल्यास ४५ टक्के फंड माल मत्तेने आणि केवळ ३२ पैकी १४ फंडांनी त्यांच्य मानदंड सापेक्ष अधिक परतावा मिळविल्याचे आढळले. लार्जकॅप फंड गटाची १ एप्रिल २०२३ ते २८ मार्च २०२४ या सरलेल्या आर्थिक वर्षातील कामगिरी तपास ल्यास ४५ टक्के फंड मालमत्तेने आणि केवळ ३२ पैकी १४ फंडांनी त्यांच्या मानदंड सापेक्षअधिक परतावा मिळविल्याचे आढळले. मागील आर्थिक वर्षात सक्रियपणे व्यवस्थापित फंडांपैकी ३१ फंडांपैकी फक्त १२ फंडांनी एस ॲण्ड पी बीएसई १००सापेक्ष अधिक परतावा कमावल्याचे दिसून आले. त्या खालोखाल केवळ ३० टक्के ईएलएसएस फंडांनी एस ॲण्ड पी बीएसई २०० या मानदंडाच्या तुलनेत कमी परतावा मिळविला. एस ॲण्ड पी बीएसई मिड–स्मॉलकॅप निर्देशांकाने ४४ टक्के परतावा दिला. परंतु या फंड गटात ७४ टक्के फंडांची मानदंड सापेक्ष कामगिरी समाधानकारक नव्हती. सरलेल्या वर्षात एस ॲण्ड पी बीएसई १०० निर्देशांकाने २३.१ टक्के तर एस ॲण्ड पी बीएसई २०० निर्देशांकाने २४.५ टक्के परतावा दिला. सक्रिय व्यवस्थापित फंडांच्या २३ लाख कोटींच्या मालमत्ते तील केवळ ३० टक्के फंडांनी मानदंड सापेक्ष अधिकपरतावा कमावला आहे. सक्रिय फंड गटाची सरासरी परतावा हा मानदंड सापेक्ष परताव्यापेक्षा कमी आहे. आठ फंड गटाची (लार्जकॅप, मिडकॅप, स्मॉल कॅप फ्लेक्सीकॅप, मल्टीकॅप, व्हॅल्यू, ईएलएसएस, आणि इक्विटी इन्कम) कामगिरी तपासली असता, केवळ२० टक्के फंडांनी त्यांच्या मानदंडा पेक्षा अधिक परतावा मिळविला आहे. सरलेल्या आर्थिक वर्षात बाजाराने विस्तृत तेजी अनुभवली. निर्देशांकातील चांगली कामगिरी करणाऱ्या सम भागांची संख्या मागील वर्षाच्या तुलनेत अधिक होती.

## कल्याणमधील बारावे कचरा प्रकल्पाला पुन्हा भीषण आग, दहा दिवसाच्या कालावधीत दुसऱ्यांदा आग



कल्याण : येथील बारावे येथील पालिकेच्या घनकचरा विभागाला गुरुवारी दुपारी भीषण आग लागली. या आगीत केंद्रात साठवण केलेला सुका कचरा जळून खाक झाला. गेल्या दहा दिवसाच्या कालावधीत बारावे घनकचरा प्रकल्पाला लागलेली ही दुसरी आग आहे. आगीची माहिती समजताच पालिका अग्निशमन दलाचे जवान तातडीने घटनास्थळी दाखल झाले. परंतु, हा प्रकल्प शहराबाहेर असल्याने आणि वाऱ्याच्या जोरदार वेगामुळे आगीने तात्काळ रौद्ररूप धारण केले होते. दूरवरून आगीच्या धुराचे लोट दिसत होते. बारावे परिसरातील उंच इमारतीमधील रहिवासी या प्रकल्पाला लागणाऱ्या सततच्या आगीने त्रस्त आहेत. आग लागल्यानंतर धुराचे लोट घरात येतात. दारे, खिडक्या लावल्या तरी कचऱ्याची दुर्गंधी अनेक दिवस कायम राहते, असे रहिवाशांनी सांगितले.

## लोकसभा निवडणुकीसाठी दिव्यांग कर्मचारी करणार २५४ मतदान केंद्रांचे नियंत्रण

मुंबई : येत्या लोकसभा निवडणुकांसाठी प्रत्येक मतदार संघात दिव्यांग कर्मचारी नियंत्रित मतदान केंद्रे असणार आहेत. राज्यभरात एकूण २५४ मतदान केंद्राचे नियंत्रण दिव्यांग कर्मचारी करणार आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाने प्रत्येक मतदारसंघात दिव्यांगांसाठी मतदान केंद्रे असावीत यावर भर दिला असून मदिव्यांग नियंत्रित मतदान केंद्रफस्थापित करण्यात येणार आहेत.

रत्नागिरी जिल्ह्यात सर्वात जास्त म्हणजे एकूण ३० मतदान केंद्रांचे नियंत्रण दिव्यांग कर्मचारी करणार आहेत. जळगावमध्ये २२, पुण्यामध्ये २१, ठाण्यामध्ये १८ आणि नाशिकमध्ये १५ दिव्यांग कर्मचारी नियंत्रित मतदान केंद्र असणार आहेत. अकोला, कोल्हापूर, लातूर, पालघर, परभणी, रायगड या ६ जिल्ह्यांत प्रत्येकी १ दिव्यांग कर्मचारी नियंत्रित मतदान केंद्र असणार आहे. गडचिरोली, सिंधुदुर्ग आणि वाशिम या जिल्ह्यात दिव्यांग कर्मचारी नियंत्रित मतदान केंद्र नसेल. या वर्षी मतदार यादीमध्ये एकूण ६,०४,१४५ इतके दिव्यांग मतदार चिन्हांकित आहेत. त्यापैकी ज्या मतदारांच्या दिव्यांगत्वाचे प्रमाण ४० टक्क्यांपेक्षा जास्त असेल अशा मतदारांपैकी इच्छुक मतदारांना टपाली मतपत्रिकेद्वारे गृह मतदानाची सुविधा उपलब्ध होणार आहे.



दिव्यांग मतदारांसाठी सक्षम ॲप भारत निवडणूक आयोगाने या वर्षी दिव्यांग मतदारांचा सहभाग वाढावा या हेतूने सक्षम हे ॲप उपलब्ध करुन दिलेले आहे. त्या माध्यमातुन तसेच विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या कालावधीत दिव्यांगांसाठी विशेष शिबिरे राबवून जास्तीत जास्त दिव्यांग मतदारांची नोंदणी करुन घेण्यात आली आहे.आजमितीस ६,०४,१४५ इतक्या मतदारांची नावे त्यांच्या मागणीनुसार दिव्यांग मतदार म्हणून चिन्हांकित करण्यात आली आहेत.



**सौ. कविता वि.म्हात्रे**
नगरसेविका, प्र.४९
डोंबिवली (प.)

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**



**श्री.विकास ग.म्हात्रे**
मा.स्थायी समिती सभापती,
नगरसेवक प्र.५०, डोंबिवली (प.)



**सौ. निलीमा सं.पाटील**
नगरसेविका, प्र. २४कल्याण (प.)

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**



**श्री.संजय पाटील**
मा.नगरसेवक कल्याण (प.)

# संपादकीय ... कराग्रे वसते लक्ष्मी ..

अखेर डॉ. विजय केळकर बोलले. वस्तू आणि सेवा कर व्यवस्थेचे मूळ आरेखनकार असलेले डॉ. केळकर यांनी ही नवीन कररचना प्रणाली अस्तित्वात आली तेव्हापासून (२०१७) 'जीएसटी' विषयी चकार शब्द कधी काढला नव्हता.

वस्तू आणि सेवा कर व्यवस्थेचे (जीएसटी) मूळ आरेखनकार डॉ. विजय केळकर यांनी अखेर सात वर्षांनंतर जाहीर मतप्रदर्शन केले..

अखेर डॉ. विजय केळकर बोलले. वस्तू आणि सेवा कर व्यवस्थेचे मूळ आरेखनकार असलेले डॉ. केळकर यांनी ही नवीन कररचना प्रणाली अस्तित्वात आली तेव्हापासून (२०१७) 'जीएसटी'विषयी चकार शब्द कधी काढला नव्हता. सुरुवातीच्या काळात या कररचनेची चांगलेच फे फे उडाली. या कररचनेत वारंवार बदल केले गेले. एखादा घटक कधी जीएसटीच्या आत, कधी बाहेर असे अनेकदा झाले. गुजरात विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर खाखरा हा खाद्यपदार्थ समस्त भारतीयांसाठी जणू जीवनावश्यक आहे असे समजून त्यावरील करात कपात केली गेली आणि पंजाब निवडणुकांचा विचार करून गुरुद्वारांतील लंगरसाठी केली जाणारी धान्यखरेदी या करातून वगळली गेली. तरीही डॉ. केळकर यांनी या कराविषयी जाहीर प्रतिक्रिया देणे नेहमीच टाळले. जीएसटी हा अप्रत्यक्ष कर. तो थेट/प्रत्यक्ष कराप्रमाणे उत्पन्नाशी निगडित नसतो. गरीब, श्रीमंत असा भेदभाव न करता सगळयांवरच अप्रत्यक्षपणे तो आकारला जातो. अशा या अप्रत्यक्ष करात महत्त्वाच्या सुधारणांची गरज डॉ. केळकर यांच्या अध्यक्षतेखालील समितीने २००० साली सुचवली होती. त्यानंतर १७ वर्षांनी तो प्रत्यक्षात आला. त्यासाठी १४ ऑगस्ट १९४७ ची आठवण करून देईल असा मोठा सोहळा संसदेत मध्यरात्री आयोजित केला गेला. हे सध्याच्या इव्हेंटीकरण संस्कृतीस तसे साजेसेच. पण लेकराच्या परीक्षेचा निकाल काय लागला याची फिकीर न बाळगता त्याच्या तीर्थरूपांनी कितीही झगझगीत सोहळा केला म्हणून चिरंजीवांच्या गुणपत्रिकेतले लाल शेरे काही कमी होत नाहीत. जीएसटीचे तसे झाले. शेवटी या योजनेचे मूळ 'वर्गशिक्षक' डॉ. केळकर यांनाही आपले मौन सोडावे लागले. राजधानीतील भाषणात त्यांनी या योजनेच्या विद्यमान वास्तवावर भाष्य केले आणि काही सुधारणा सुचवल्या.

डॉ. केळकर तीन प्रमुख सूचना करतात. आताच्या पाच-सहा दर वैविध्यांच्या तुलनेत एकच एक सरसकट १२ टक्के इतकीच कर आकारणी केली जावी, ही पहिली. सध्या जीएसटीचे नियंत्रण बहुतांशी केंद्राकडून होते. यामुळे केंद्र आणि राज्य यांच्यात विसंवाद निर्माण होतो आणि केंद्रातील सत्ताधारी पक्षाची सत्ता ज्या राज्यांत आहे आणि नाही त्यांच्यात एक घर्षण होत राहते. त्यामुळे केंद्रनियंत्रित जीएसटी परिषद ही केंद्रापासून अ-संलग्न करून तीस अधिक स्वातंत्र्य दिले जावे. ही दुसरी. आणि असे झाल्यानंतर या करांतून येणाऱ्या महसुलात स्थानिक स्वराज्य संस्थांनाही वाटा दिला जावा, ही त्यांची तिसरी सूचना. हे तीनही मुद्दे अत्यंत स्वागतार्ह आणि तसेच नितांत गरजेचे आहेत. त्यामुळे या करातील 'अनावश्यक गुंतागुंत' दूर होईल. सध्याच्या राजकीय उन्मादी वातावरणात हा असा विषय दुर्लक्षित राहण्याचीच शक्यता अधिक. त्यात विद्यमान व्यवस्थेस तज्ज्ञांचे कमालीचे वावडे. या वास्तवाकडे दुर्लक्ष करून डॉ. केळकर यांनी केलेल्या तीन अत्यंत महत्त्वाच्या सूचनांचे स्वागत आणि त्यावर मतप्रदर्शन आवश्यक ठरते.

सद्य:स्थितीत आपल्याकडे शून्य, पाच, १२, १८, २८ टक्के वर अधिक दहा टक्के अधिभार अशा अनेक टप्प्यांत जीएसटी कर आकारला जातो. तसेच पेट्रोल, डिझेल आणि मद्य या घटकांचा अंतर्भाव जीएसटीत नाही. हे दोन्हीही मुद्दे जीएसटीच्या मूळ तत्त्वालाच हरताळ फासणारे आहेत आणि पहिल्या दिवसापासून या अशा 'दिव्यांग' कराची अंमलबजावणी सुरू आहे. 'एक देश एक कर' हे आणि कोणत्याही घटकास या कर परिघाबाहेर ठेवायचे नाही, हे जीएसटीचे मूलभूत तत्त्व. तथापि सद्य:स्थितीत अनेक पातळयांवर कर आकारला जात असल्याने अनेक वस्तू निर्माते वा सेवादार यांचा प्रयत्न असतो तो आपणास कमीत कमी कर कसा लागू होईल, याचा. त्यातून लबाडया होतात. त्यात आपल्याकडचे सुरुवातीचे काही हास्यास्पद भेदभाव. नाममुद्राधारी बंद पिशव्यांतून तांदूळ विकला तर कराचा एक दर आणि तोच उघडया पोत्यांतून विकल्यास त्यास दुसरा दर! अशा बिनडोक वर्गीकरणांमुळे या कररचनेतील व्यंग अधिकच वाढले. शिवाय इंधन आणि मद्य यांस करजाळयात न आणल्याने कोणत्याही वस्तू/सेवा यांच्या दरनिश्चितीत महत्त्वाचा असलेला इंधन हा घटक कराबाहेरच राहिला. यामुळे विसंगती आणखीच वाढली. हे सर्व निर्णय घेतले जातात जीएसटी परिषदेत. तीत सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांचा सहभाग असतो. वरवर पाहता केंद्र सरकार ही परिषद तिचे निर्णय घेण्यास समर्थ आहे आणि त्या निर्णयाशी सरकारचा काही संबंध नाही, असे म्हणू शकते. हा लबाड युक्तिवाद भक्तगणांस रिझवण्यासाठी छान. पण तो शास्त्रकाटयाच्या कसोटीवर टिकणारा नाही. या परिषदेत नकाराधिकाराचा अधिकार (व्हेटो) फक्त केंद्रास आहे आणि कोणताही प्रस्ताव राज्यांस मांडावयाचा असेल तर त्यास किमान १० ते १२ राज्यांचे समर्थन असावे लागते. ते समजा मिळाले आणि एखाद्या बदलाच्या बाजूने राज्यांचा कल असला; पण केंद्रास हा बदल मंजूर नसेल तर बदलाच्या बाजूच्या मतांचे प्रमाण एकूण मतांच्या तीनचतुर्थांश इतके होऊच शकत नाही. म्हणजे केंद्रास जे नामंजूर ते प्रत्यक्षात येणे अशक्य. त्यातूनच केंद्र आणि राज्य यांत खटके उडू लागले असून तमिळनाडू, पश्चिम बंगाल यांसारख्या भाजपेतर राज्यांनी वेगळी चूल मांडण्याची भाषा सुरु केली आहे. तूर्त तरी आपला देश हे संघराज्य आहे. म्हणजे केंद्र आणि राज्ये या दोन्हींस कर अधिकार आहेत. पण जीएसटी परिषद सरळ सरळ राज्यांच्या अधिकारांचा संकोच करते. अनेक राज्यांत केंद्रातील सत्ताधारी भाजपचीच सरकारे असल्याने या रचनेस उघड विरोध केला जात नाही. तरीही येडियुरप्पा हे भाजपचेच नेते कर्नाटकाचे मुख्यमंत्री असताना त्यांच्या सरकारनेही याविरोधात सूर लावला होता. त्यामुळे डॉ. केळकर यांची दुसरी सूचनाही तितकीच महत्त्वाची.

तिसरा मुद्दा आहे तो दिवसेंदिवस कफल्लक होत चाललेल्या आपल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा. एखादी मुंबई वगळता आपल्या अन्य अनेक शहरांस उत्पन्नाचे काही साधनच नाही. कसाबसा हाती लागणारा मालमत्ता कर हा कर्मचाऱ्यांच्या वेतनासही पुरत नाही. बरे राज्य सरकारांकडे काही मागावे तर तीही दरिद्रीच. कारण सगळे कर अधिकार वस्तू/सेवा कर घेऊन गेलेला. राज्यांहाती पूर्वी 'विक्री कर', 'अबकारी' असे काही अधिकार असत. आता ते नाहीत. जीएसटीने हे सर्व कर काढून घेतले. त्यामुळे राज्यांनाच आता केंद्राकडून मिळणाऱ्या जीएसटीतील वाटयाकडे डोळे लावून बसावे लागते. राज्यांच्या आडातच नसेल तर मग त्याखालच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पोहऱ्यात काय येणार ? तेव्हा पहिली सूचना अमलात आली तर केंद्राच्या तिजोरीत कराचा ओघ वाढेल, दुसऱ्या सुधारणेमुळे राज्ये स्वखुशीने जीएसटीचा आवाका वाढवतील आणि असे झाल्यास तिसरी सूचना प्रत्यक्षात आणता येईल आणि दरिद्री होत चाललेल्या आपल्या शहरांच्या हातांवर काही टेकवता येईल.

''नवीन सरकारने जीएसटी रचनेत हे महत्त्वाचे बदल करावेत'',असा डॉ. केळकर यांचा सल्ला आहे. आपला आशावाद प्रत्यक्षात येईल, असेही त्यांस वाटत असावे. खरे तर गेल्या सात वर्षांत डॉ केळकर यांनी सर्वोच्च सत्ताकेंद्रापुढेही अनेकदा हे सुधारणा प्रस्ताव दिले असणार. तेव्हा त्यांचे काही झाले नाही. पण 'पुढच्या सरकार'ने तरी ते करावे. सहज, सोप्या कररचनेत लक्ष्मी असते. कररचना जितकी सुलभ-सोपी, तितके लक्ष्मीचे दान अधिक. या सत्यासाठी तरी करसुधारणा व्हाव्यात, ही आशा.★★★

# सदगुरु वाचून सापडेल सोय !

'सद्गुरु'नावाने ओळखले जाणारे जग्गी वासुदेव यांना १७ मार्च रोजी मेंदूत रक्तस्राव झाल्याने रुग्णाल यात दाखल व्हावे लागले.

**डॉ.हमीद दाभोलकर मनोविकारतज्ज्ञ, मअंनिस कार्यकर्ता**

आधुनिक उपचारांवर टोकाची टीका करणारी, केवळ ध्यानधारणेने आजार दूर होऊ शकतात, असे दावे करणारी व्यक्ती स्वत: आजारी पडल्यावर आधुनिक वैद्यकशास्त्राची मदत घेत असेल, तर या दाव्यांची सार्वजनिक चिकित्सा करणे आपले कर्तव्य ठरते.. 'सद्गुरु' नावाने ओळखले जाणारे जग्गी वासुदेव यांना १७ मार्च रोजी मेंदूत रक्तस्राव झाल्याने रुग्णाल यात दाखल व्हावे लागले. रक्तस्राव होण्याच्या जवळ पास एक आठवडा आधी पासून रक्तदाब वाढल्यामुळे त्यांचे डोके दुखत होते. त्यांनी स्वत:च्या आरोग्याकडे दुर्लक्ष केले.दुखणे बळा वल्यामुळे त्यांच्या मेंदूवर शस्त्रक्रिया केल्याची माहिती 'ईशा फाऊंडेशन'ने दिली. दिल्लीमधील अपोलो रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले. शस्त्रक्रिया आणि इतर औषधोपचारांनी त्यांचा त्रास आटोक्यात आणण्यात आला. चांगली गोष्ट अशी की, आता त्यांची प्रकृती उत्तम आहे आणि त्यांना घरी पाठवण्यात आले आहे. एखाद्या व्यक्तीचे आजारपण ही त्याची खासगी बाब आहे. त्याविषयी सार्वजनिक चर्चा करू नये, असा संकेत आहे, पण जर हे आजारपण आधुनिक विज्ञानाच्या माध्यमातून मिळणाऱ्या उपचारांवर टोकाची टीका करणाऱ्या, डॉक्टरकडे जाण्याची काहीही गरज नाही, केवळ ध्यानधारणेने मेंदूचे आजार दूर पळवले जाऊ शकतात असे दावे करणाऱ्या व्यक्तीचे असेल आणि त्या व्यक्तीला आपल्या शिष्यांना दिलेल्या सल्ल्याच्या विरोधात स्वत:च आधुनिक वैद्यक शास्त्राची मदत घ्यावी लागत असेल, तर मात्र त्याची सार्वजनिक चिकित्सा करणे आपले कर्तव्य ठरते. माणूस जसजसा सुशिक्षित होईल, तशा अंधश्रद्धा आपोआप गळून पडतील, मग अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य स्वतंत्रपणे करण्याची गरज काय, असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. जग्गी वासुदेव आणि त्यांचे पाठीराखे यांच्यावर नजर टाकली तर या प्रश्नाचे उत्तर सहज मिळते. जग्गी वासुदेव यांचे बहुतांश शिष्य हे उच्चशिक्षित आहेत. स्वत: जग्गी वासुदेव अस्खलित इंग्रजी बोलतात. एवढेच नव्हे, इंग्रजी भाषेत ज्याला स्लँग म्हणजे शिवराळ भाषा म्हणतात त्यातील काही शब्दही ते अनेकदा वापरतात. ते थेट चमत्कारांचा दावा करत नसले, तरी जागोजागी अशास्त्रीय विधाने करताना दिसतात. ही विधाने करताना ते भाषा मात्र आधुनिक विज्ञानातील वापरतात. ब्रेन, हॉर्मोन, न्युरॉन



आधुनिक विज्ञानातील अनेक संज्ञा त्यांच्या बोलण्यात येतात. हे शब्द केवळ वैज्ञानिकतेचा आभास निर्माण करण्यासाठी वापरलेले असतात. जसे विज्ञानाच्या नावावर अंधश्रद्धा पसरविणारे 'छद्मविज्ञान' हे केवळ विज्ञानाची परिभाषा वापरते पण विज्ञानाची कार्यपद्धती वापरत नाही, तसेच जग्गी वासुदेव यांचे बोलणे असते. आपण सांगत असलेल्या ध्यान पद्धतीने मेंदूतील पेशींचे २४० टक्के अधिक पुनर्निर्माण होते, असा दावा ते करतात. ज्या ध्यानधारणा पद्धती ते सांगतात त्या वापरल्यास शरीर स्वत:च स्वत:ला बरे करते, डॉक्टरकडे जाण्याची वेळ येत नाही, असेही त्यांचे म्हणणे आहे. आता यातील प्रत्येक दाव्यात थोडेबहुत तथ्य आहे. जसे, मानवी शरीराची स्वत:ची प्रतिकारशक्ती असते आणि सौम्य दुखणी बरी करण्या साठी केवळ त्या प्रतिकार शक्तीला बळ देणे उपयोगी पडते, हे खरेच आहे. अगदी तीव्र आजारात देखील कसलेले डॉक्टर या मानवी शरीराच्या प्रतिकारशक्तीचा उपयोग रुग्णाला बरे करण्यासाठी करून घेण्याचा प्रयत्न करतात, पण याचा अर्थ मानवी शरीर स्वत:चे स्वत: बरे होते आणि डॉक्टरकडे जाण्याची गरज भासत नाही, असा होत नाही! सद्गुरू इंग्रजीत संभाषण करतात, सर्वज्ञानी असल्याचा आव आणतात, त्यामुळे भारावून गेलेले लोक मग सद्गुरू सांगतील ते खरे मानून चालतात. या सगळयाचा तोटा असा होतो की, शारीरिक त्रासाची लक्षणे असूनही तज्ज्ञ डॉक्टरला दाखवण्याची गरज असताना देखील केवळ सद्गुरूंनी सांगितले आहे म्हणून अनेक लोक आपले दुखणे अंगावर काढतात. परिणामी आजार बळावतो. आजाराचे दुष्परिणाम संबंधित व्यक्तींना भोगावे लागतात. स्वत: जग्गी वासुदेव यांनीदेखील त्यांचे दुखणे अंगावर काढल्याने ते बळावले, असे त्यांच्या ईशा फाऊंडेशनने सांगितले आहे, पण अशा वेळी मेंदूतील पेशी ध्यानाच्या माध्यमातून स्वत:ला दुरुस्त करतील हा लोकांसाठी सांगितलेला मार्ग न अनुसरता जग्गी वासुदेव यांनी आधुनिक वैद्यकीय उपचार घेतले. जग्गी वासुदेव यांनी उपचार घेऊन बरे होणे योग्यच होते, पण या पार्श्वभूमीवर जसे विज्ञान आपल्या चुकांची कबुली देऊन पुढील धोरण दुरुस्त करते, तसे जग्गी वासुदेव करतील याची फारशी शक्यता नाही. आताच त्यांच्या पाठीराख्यांनी- जग्गी वासुदेव हे खरे तर जगाचे कल्याण करण्यात प्रचंड मग्न असतात, त्यांच्या अनुयायांवर येणारे संकट त्यांनी स्वत:वर घेतले, त्यामुळे त्यांना त्रास झाला, असे दावे करण्यास सुरुवात केली आहे. जग्गी वासुदेव यांनी आधुनिक विज्ञानाचा आधार घेतला असला, तरी ते त्यांच्या आंतरिक शक्तीनेच बरे झाले, असेदेखील सांगण्यास सुरुवात केली आहे. तंत्र-मंत्र, गंडेदोरे, तावीज, क्रॉस देणारे बाबा, फकीर, पाद्री यांच्या दाव्यांची चिकित्सा करणे आणि त्यातील फोलपणा दाखवणे हे तुलनेने खूपच सोपे असते, तरीही खूप लोक त्याला फसतात. जग्गी वासुदेव यांच्यासारखे खरे आणि खोटे यांचे बेमालूम मिश्रण करणारे, आधुनिक विज्ञानाची भाषा वापरून वैज्ञानिक दृष्टिकोना कडे मात्र जाणीवपूर्वक दुर्लक्ष करणारे अशांच्या फसवणुकी विरोधातील लढाई अधिकच अवघड आहे, हे आपण सर्वांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. दुसऱ्या बाजूला आधुनिक विज्ञाना धारित वैद्यकीय व्यवसायात देखील सगळे आलबेल आहे असे अजिबात नाही. रुग्ण आणि डॉक्टर यांचे संबंध कधी नव्हे इतके ताणले गेले आहेत. वैद्यकीय उपचारांचा खर्च अनेक ठिकाणी सामान्य माणसांना परवडत नाही. आधुनिक उपचार पद्धतींमध्ये अनेकदा रुग्णांच्या सांस्कृतिक जाणिवा, त्यांच्या वैद्यकीय मदत घेण्याच्या पद्धती, वैद्यक शास्त्राविषयी त्यांच्या मनात असलेले समज-गैरसमज समजून घेण्यासाठी पुरेसे प्रयत्न केले जात नाहीत. रुग्ण आणि त्याच्या नाते वाईकाला न हिणवता संवाद साधणे यां सारख्या अनेक गोष्टींमध्ये सुधारणा करण्या साठी मोठा वाव आहे. पण छद्मविज्ञान आणि त्याच्या नावावर चालणारी भोंदुगिरी आणि आधुनिक विज्ञान यातील सर्वात मोठा फरक म्हणजे आधुनिक विद्यान हे सर्वज्ञान असल्याचा दावा करत नाही! आपल्याकडे काही विशेष शक्ती आहे किंवा 'लाख दुखों की एक दवा आहे' असादेखील दावा करत नाही. आधुनिक विज्ञानाच्या प्रत्येक दाव्याची चिकित्सा कोणाच्या ही भावना न दुखावता करता येते जे जग्गी वासुदेव, रामदेव बाबा यांच्यासारख्यालोकांच्या बाबतीत शक्य होत नाही. अशा स्वयंघोषित बाबा-बुवांमधील रामपाल राम रहीम, आसाराम हे आज तुरुंगात आहेत. रामदेव बाबा यांच्यावर दर आठवडयाला सर्वोच्च न्यायालय ताशेरे ओढत आहे, हे आपण विसरता कामा नये.

सरतेशेवटी अशा परिस्थितीत एक सामान्य व्यक्ती म्हणून आपण काय करावे, हा प्रश्न शिल्लक राहतो. आपण हे समजून घेतले पाहिजे की जीवनातील प्रत्येक जटिल प्रश्नाची उत्तरे विज्ञानाकडेदेखील नाहीत, पण वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे आपल्या बुद्धीच्या माध्यमातून त्या गोष्टीमागचा कार्यकारण भाव समजून घेणे, ही उत्तरे शोधण्याचीमानवाला उपलब्ध असलेली सर्वात उपयुक्त आणि प्रभावी पद्धत आहे. यापलीकडे मानवी बुद्धीला जी कोडी आज सुटत नाहीत, अशा अनेक गोष्टी आपल्या आयुष्यात आणि आजूबाजू ला शिल्लक राहतात. त्यांना जादूई उत्तरे शोधण्याऐवजी शास्त्रीय दृष्टीने जितके शक्य आहे तितके करणे आणि जे शक्य नाही त्याचा आहे तसा स्वीकार करणे हे कौशल्य शिकणे आपल्यातील प्रत्येकाला शक्य आहे. गाडगेबाबा म्हणत त्याप्रमाणे, 'माह्या कोणी गुरू नाही आणि मी कुणाचा चेला नाही!'हे वाक्य थोडे कठोर वाटले तरीदेखील आपण ते विसरता कामा नये. 'सद्गुरू वाचून सापडेना वाट'ही उत्तरे शोधण्या साठी असलेली वहिवाट सोडून विंदा करंदीकर हे वाक्य थोडे कठोर वाटले तरीदेखील आपण ते विसरता कामा नये. 'सद्गुरू वाचून सापडेना वाट' ही उत्तरे शोधण्यासाठी असलेली वहिवाट सोडून विंदा करंदीकर म्हणतात, त्या प्रमाणे 'सद्गुरू वाचून सापडेल सोय!' हा विश्वास मनात ठेवला पाहिजे. दासाचे दासपण नष्ट होण्याचा तोच एक हुकमी मार्ग आहे. ★★

# 'हा' एक ड्रायफ्रूट्स खाल्ल्याने खराब कोलेस्ट्रॉल झपाट्याने होईल कमी

खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, बैठी जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते.फक्त सेवनाची पद्धत एकदा डॉक्टरांकडून जाणून घ्यानिरोगी आयुष्यासाठी हृदय निरोगी ठेवणे आवश्यक आहे. तुमचे हृदय निरोगी ठेवण्यासाठी आणि योग्यरित्या कार्य करण्यासाठी तुम्ही तुमचे रक्तदाब आणि कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करणे महत्त्वाचे आहे. कोलेस्ट्रॉल ही गंभीर समस्या बनली आहे. शरीरातील खराब कोलेस्ट्रॉलचे उच्च प्रमाण तुम्हाला हार्ट अटॅक आणि स्ट्रोकचा धोका निर्माण करू शकते. रक्तातील खराब कोलेस्ट्रॉलची वाढती पातळी तुमच्या हृदयाच्या आरोग्यासाठी अत्यंत धोकादायक आहे. खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, बैठी जीवनशैली आणि व्यायामाचा अभाव यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी वाढते. चुकीच्या जीवनशैलीचा आरोग्यावर विपरीत परिणाम होत असतो.

चांगले आरोग्य राखण्या साठी योग्य आणि पोषक आहार महत्त्वाचा असतो. कोलेस्ट्रॉल कमी करण्याचे अनेक मार्ग आहेत. बाजारातील अनेक औषधे तुमच्या कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करू शकतात. औषधांव्यतिरिक्त तुमच्या कोलेस्ट्रॉलच्या पातळीवर लक्षणीय परिणाम करण्यासाठी तुम्हाला तुमचा आहार आणि जीवनशैली बदलण्याची देखील आवश्यकता आहे. पण, आहारात कोणत्या पदार्थांचा समावेश केल्याने कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवता येईल. कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी मनुका हे उत्तम अन्न आहे. हे फायबरमुळेच नाही तर मोठ्या प्रमाणात कोलेस्ट्रॉल कमी करणाऱ्या फायटोन्यूट्रिएंट्समुळेदेखील आहे. मनुक्यांमध्ये नैसर्गिक शर्करा असते, जे खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यास



मदत करते", असे एका अभ्यासाचा हवाला देत त्यांनी सांगितले.चार आठवड्यांपर्यंत दररोज एक मनुका घेतल्याने कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होते. मनुकामध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असते. अशा परिस्थितीत ते तुमची प्रतिकार शक्ती वाढवण्याचे काम करते. मनुका हा अघुलनशील आहारातील फायबरने समृद्ध आहे, ज्यामुळे आतड्यांची हालचाल सुधारण्यास मदत होते. मनुक्यांमधील अँटी-ऑक्सिडंट्स बॅड कोलेस्ट्रॉल कमी करण्यास आणि गुड कोलेस्ट्रॉल वाढवण्यास मदत करते, ज्यामुळे ब्लड सर्क्युलेशन सुधारते आणि हृदय निरोगी राहते. मनुका हृदयाच्या आरोग्यासाठी खरोखरच फायदेशीर आहे, कारण त्यात अँटीऑक्सिडंट्स, फायबर आणि जीवनसत्त्वे जास्त आहेत. मनुकामध्ये फिनोलिक संयुगेसारखे अँटिऑक्सिडेंट असतात, जे कोलेस्ट्रॉल कमी करण्यासह हृदय व रक्त वाहिन्यांसंबंधी आरोग्य फायद्यांशी संबंधित असतात.


चार आठवडे दिवसातून एक मनुका खाल्ल्याने कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते. ★★

# उष्ण तापमानामुळे होतो सन स्ट्रोक ? अशी घ्या तुमच्या त्वचेची काळजी

उष्ण तापमानामुळे आपल्याला डीहायड्रेशन सन स्ट्रोक आणि सनटॅन होऊ शकतो. जाणून घेऊया उष्ण तापमानात सन स्ट्रोक आणि सन टॅन पासून त्वचेची काळजी काशी घ्यावी. उन्हाळ्यात उष्ण तापमानामुळे आपल्या शरीरात अनेक बदल होतात. वातावरणात अधिक उष्णता असली की आपल्या शरीराला अतिरिक्त थकवा जाणवू शकतो. हे तुमच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. उष्ण तापमानामुळे आपल्याला डीहायड्रेशन सन स्ट्रोक आणि सन टॅन होऊ शकतो.जाणून घेऊया उष्ण तापमानात सन स्ट्रोक आणि सन टॅन पासून त्वचेची काळजी काशी घ्यावी. हवेतील उष्णतेचे प्रमाण वाढले की लगेच त्याच्या परिणाम आपल्या त्वचेवर होतो आपली त्वचा सतत कोरडी पडायला लागते. यासाठी तुम्ही जास्त प्रमाणात पाणी आणि फळाच्या रसाचे सेवन करू शकता यामुळे तुमच्या शरीरला पर्याप्त हायड्रेशन मिळेल.सन स्ट्रोकमुळे आपल्या त्वचेवर लालसरपणा येतो किंवा कधी आपल्याला अधिक घाम ही येऊ शकतो. यापासून त्वचेचे रक्षण करण्यासाठी तुम्ही सनस्क्रीन वापरू शकता. उन्हाळ्यात सनस्क्रीन वापरण्याचे असंख्य फायदे आहेत तुम्ही बाहेर जाण्यापूर्वी किमान १५ ते २० मिनिटे आधी सनस्क्रीन लावली पाहिजे. यामुळे सन टॅन होण्याची शक्यता कमी होते.उन्हात बाहेर जाताना तुम्ही सनग्लासेस वापरू शकता कारण अधिक उष्णतेमुळे आपल्या डोळ्यांना देखील त्रास होतो. उन्हाचे हानिकारक किरणांचा परिणाम आपल्या डोळ्यांच्या कॉर्निया आणि रेटिनावर होतो यासाठी सनग्लासेस घालणे आवश्यक आहे. उन्हात बाहेर जाताना सन टॅन पासून वाचण्यासाठी तुम्ही गडद रंगाचे कपडे घातले पाहिजेत कारण हे रंग जास्त यूवी किरण शोषून घेतात. यामुळे सन टॅनचा धोका कमी होतो.

# शेतकऱ्यांचे १ लाख ६० हजार पर्यंतच्या कर्जावरील मुद्रांक शुल्क माफ

**बीड मधील किसान क्रेडीट कार्ड डिजीटायझेशन - जनसमर्थ प्रकल्पाचा शुभारंभ**
**एका क्लिकने शेतकऱ्यांच्या खात्यात पीक कर्जाची रक्कम जमा**



मुंबई :शेतकऱ्यांच्या एक लाख ६० हजार रुपयांपर्यंतच्या कर्जासाठीचे मुद्रांक शुल्क माफ करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केली. बीड जिल्ह्यातील किसान क्रेडीट कार्डच्या डिजीटल प्रकल्प जनसमर्थचा शुभारंभ दृक श्राव्य प्रणालीच्या माध्यमातून मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाला. या कार्यक्रमात ही घोषणा केली.

'सरकार शेतकऱ्यांच्या पाठिशी उभे राहणारे आहे. डिजीटल क्रांतीचा वापर शेतकऱ्यांसाठी करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या या डिजीटल प्रकल्पामुळे शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती येणार आहे, असेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले.

कार्यक्रमात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते बीड जिल्ह्यातील २२ शेतकऱ्यांच्या खात्यात किसान क्रेडीट कार्डच्या माध्यमातून थेट रक्कम एका क्लिकद्वारे जमा करण्यात आली. या कार्यक्रमास राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे, उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार संजय रायमुलकर, कृषि विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव अनूप कुमार, कृषि आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, विभागीय आयुक्त मधुकरराजे अर्दड, जिल्हाधिकारी दीपा मुधोळ- मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.किसान क्रेडीटकार्डच्या डिजीटायझेशन च्या या जनसमर्थ प्रकल्पासाठी देशातील दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली. त्यामध्ये बीड जिल्ह्याचा समावेश करण्यात आला. बीड जिल्ह्यातील महसूल, कृषि अशा विविध विभागांनी एकत्र येऊन गेल्या काही दिवसांत ४ लाख ७५ हजार शेतकऱ्यांची नोंदणी करून त्यांचे फार्मर्स आयडी तयार केले आहेत. याकरिता दोन ॲपचीही निर्मिती करण्यात आली आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्याला कागदपत्र विरहीत आणि घर बसल्या अल्पमुदतीच्या कर्जासाठी अर्ज करता येतो. याशिवाय या आयडीमुळे त्यांना शासनाच्या अन्य योजनांसाठीही अर्ज करणे आणि लाभ घेणे सुलभ होणार आहे. "ॲग्रीस्टॅक- सीपीएमयू" यांच्याकडून या प्रकल्पाचे कार्यान्वयन केले जात आहे. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, आमचे सरकार सर्वसामान्यांचे आणि शेतकऱ्यांचे आहे. हे सरकार बळीराजाचे आहे, याचा आम्हाला अभिमान आहे. शेतकऱ्यांच्या अतिवृष्टी, गारपीट अशा नैसर्गिक संकटात आपण त्यांना भरभरून मदत केली आहे. आपला देश कृषि प्रधान आहे. आपण शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानूनच सर्व योजनांचे नियोजन करतो आहोत. शेतकऱ्याना गेल्या दिड वर्षात ४५ हजार कोटींचे मदत आपण केली आहे. सिंचनांचे १२० प्रकल्प मार्गी लावले आहेत. यामुळे राज्यातील १५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. शेती, माती आणि शेतकरी यांच्याशी आपली नाळ जोडलेली आहे, असे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्य सरकार राबवत असलेल्या एक रुपयात पीक विमा, जलयुक्त शिवार अशा योजनांचीही माहिती दिली. मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना कृषि क्षेत्राचा विकास करण्याचा संकल्प केला आहे. त्यामुळेच डिजीटल क्रांतिचा वापर शेतकऱ्यांसाठी आणि कृषि क्षेत्रासाठी करण्याचा हा त्यांच्या संकल्पनेतील प्रकल्प देखील शेतकऱ्यांच्या जीवनात क्रांती आणणारा ठरेल.शेतकरी, बळीराजा हा अन्नदाता, मायबाप आहे. आम्ही सदैव त्यांच्या पाठीशी उभे राहणार असल्याचा पुनरुच्चारही मुख्यमंत्र्यांनी केला.

शेतकऱ्यांच्या कर्जासाठी लागणारे मुद्रांक शुल्क माफ करण्याच्या मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या घोषणेचे कृषिमंत्री श्री. मुंडे यांनी स्वागत केले. या निर्णयाचा पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांना निश्चित मोठा दिलासा मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले. मंत्री श्री. मुंडे म्हणाले की, देशातील सहा जिल्ह्यात हा पथदर्शी प्रकल्प राबवण्यात आला.त्यामध्ये बीड आणि उत्तर प्रदेशातील फरुखाबाद या जिल्ह्यांनीच याची यशस्वी कार्यवाही केली. बीड जिल्ह्यातील सर्वच यंत्रणांनी अहोरात्र राबून सुमारे १ हजार २५१ गावांतील शेतकऱ्यांचा डाटा एकत्र केला. यातून सुमारे ४ लाख ७५ हजार शेतकऱ्यांचे फार्मर्स आयडी तयार करण्यात आले आहेत. बीड जिल्ह्याची निवड ही आपल्या राज्यासाठी अभिमानास्पद आहे. तसेच राज्यातील कृषि क्षेत्रातील विकासाला चालना देणारी ठरणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी या प्रकल्पासाठी काम करणाऱ्या तलाठी, ग्रामसेवक, कृषि सहायक तसेच जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय अधिकारी- कर्मचाऱ्यांचेही कौतुक केले. जिल्हाधिकारी श्रीमती मुधोळ-मुंडे यांनी प्रास्ताविक केले तसेच आभार मानले.

★★★

# 'महाप्रित'ची राज्याबाहेर भरारी; गोवा शासनाचे सोलर प्रकल्प त्वरित सुरु!

मुंबई : गोवा शासनाने महाप्रितबरोबर केलेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने सुमारे २०० कोटी रुपयांची सोलरविषयक



कामे मंजूर करण्यासाठी तत्वत: मान्यता दिली आहे. नुकत्याच झालेल्या दावोस येथील परिषदेमध्ये सुमारे ७० हजार कोटी रुपयांचे परदेशी गुंतवणूकीबाबत सामंजस्य करार करण्यात आले.अनेक प्रकल्प महाप्रितने हाती घेतले असून गोव्यामध्ये नुकतीच मान्यता मिळालेले प्रकल्प याचाच भाग आहे.मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या सातत्याने मार्गदर्शन व पाठबळामुळे महाप्रितचे अल्प कालावधीतील अनेक प्रकल्पांचे कार्यारंभ झालेले असून उर्वरित प्रकल्पांचा लवकरच कार्यारंभ होईल. यामध्ये शासकीय इमारतीवर रूफ टॉप सोलर, पीएम कुसुम अंतर्गत उपकेंद्रा जवळील शासकीय जागेत लहान आकाराचे सोलर लावणे, पणजी शहरांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचे चार्जिंग स्टेशन उभारणे, या कामाबाबत करार करण्यात आला आहे. गोवा राज्यातील सुमारे दोनशे शासकीय इमारतीवर रूफ टॉप सोलर बसविण्यात येणार आहे. त्यामुळे सुमारे ३० मेगावॅट एवढी हरित ऊर्जा स्थापित होणार आहे. प्रतिवर्षी सुमारे ५०० मिलियन युनिटस एवढी हरित ऊर्जा तयार करण्याचे उद्दिष्ट आहे. पीएम कुसुम योजनेंतर्गत एकूण १४ मेगावॅट जमिनीवरील सोलर प्रकल्प उभारण्यात येणार आहेत.शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून शासनाचा सबसिडीवरचा खर्च टप्प्याटप्प्याने कमी होणार आहे. तसेच महाप्रितमार्फत नावीन्यपूर्ण व्यावसायिक मॉडेल अंतर्गत इलेक्ट्रिक वाहनांसाठी वीज चार्जिंग स्टेशन्स उभारण्यात येणार आहेत. यामुळे गोव्यामध्ये ग्रीन मोबिलीटीचा प्रसार होण्यास मदत होणार आहे.या प्रकल्पांना गोवा शासनाने तत्वत: मान्यता दिली असून लवकरच प्रत्यक्ष कामास सुरूवात होणार आहे. ★★★

# जिल्हा रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय या आरोग्य मंदिरांचा कायापालट करण्यास प्राधान्य

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते धाराशिव येथील ५०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाचे ऑनलाईन भूमिपूजन**

मुंबई :राज्य शासनाने ग्रामीण भागातील आरोग्य सुविधा बळकट करण्यास प्राधान्य दिले आहे. राज्यातील जिल्हा रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालये यांचा कायापालट करण्यात येणार असून या ठिकाणी दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध करुन देऊन आरोग्य सेवेची ही मंदिरे अधिक सुसज्ज केली जातील.असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केले.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत धाराशिव येथे उभारण्यात येणाऱ्या नवीन ५०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



यांच्या हस्ते दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे करण्यात आले. मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी झालेल्या कार्यक्रमास सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे),राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई,क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे,आमदार मंदा म्हात्रे,आमदार मनीषा कायंदे, आमदार राजेश पवार, आमदार बालाजी कल्याणकर,माजी आमदार रामदास कदम, सार्वजनिक आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर (दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे), आरोग्य सचिव नवीन सोना, आयुक्त धीरजकुमार,आरोग्य सेवा संचालक डॉ.नितीन आंबाडेकर तर धाराशिव येथील भूमिपूजन कार्यक्रम स्थळावरून मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. प्रविणसिंह परदेशी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनक घोष,आरोग्य विभागाच्या लातूर परीमंडळाच्या उपसंचालक डॉ.अर्चना भोसले, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, कार्यकारी अभियंता नरसिंग भांडे, प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.इस्माईल मुल्ला, जिल्हा आरोग्य अधिकारी व अनील खोचरे यांची प्रमुख उपस्थिती होती मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी धाराशिव जिल्ह्यात होत असलेल्या सुसज्ज ५०० खाटांच्यारुग्णालया बद्दल त्यांचे अभिनंदन केले.ते म्हणाले सर्व सामान्यांना दर्जेदार कमी खर्चात आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी राज्य शासनाने प्राधान्य दिले आहे.आरोग्य विभागाला यासाठी आवश्यक निधी व यंत्र सामग्री उपलब्ध करून दिली जात आहे. राज्यात वैद्यकीय महाविद्यालयांसोबतच स्वतंत्र सुपर स्पेशालिटी सिव्हिल हॉस्पिटल सुरू करण्याचा निर्णय घेतला असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी म्हणाले .

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, आमचे शासन हे दिलेला शब्द पाळणारे शासन असून धाराशिव येथे उभारण्यात येत असलेले ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय हे त्याचेच एक उदाहरण आहे. शासनाने महात्मा फुले जन आरोग्य योजनेत दीड लाखाहून पाच लाखापर्यंत उपचाराच्या खर्चास मान्यता दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या आयुष्यमान भारत योजना व राज्य शासनाच्या महात्मा फुले जन आरोग्य योजना यामुळे सर्वसामान्यांना वैद्यकीय सेवा विनासायास उपलब्ध होत असल्याचे सांगितले.

मुख्यमंत्री सहायता निधीतूनही गेल्या दीड वर्षात सुमारे २०० कोटीपर्यंत मदत दिली असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले, सर्वसामान्यांच्या आरोग्यासाठी राज्यात ७०० ठिकाणी बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्यात येत असून जवळपास ३०० ठिकाणी हे दवाखाने सुरू झाले आहेत.आता कॅशलेस वैद्यकीय सेवा ही सुरू करत असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री श्री शिंदे म्हणाले, सांगली सातारा जिल्ह्यात स्मार्ट पीएचसी सारखा उपक्रम राबविला जात आहे. अशा उपक्रमातून सर्वसामान्यांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळत आहेत. धाराशिव येथे उभारण्यात येत असलेल्या या रुग्णालयाचा औसा, उमरगा,बार्शी व परंडा या भागातील जनतेस लाभ होणार असून या ठिकाणी वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल. आरोग्य मंत्री तथा पालकमंत्री डॉ. सावंत म्हणाले, राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आरोग्य विभाग नेहमीच दक्ष आहे. धाराशिव जिल्हा हा आकांक्षित जिल्हा म्हणून ओळखला जातो.या जिल्ह्यात होत असलेल्या या जिल्हा रुग्णालयामुळे या भागातील जनतेला चांगल्या व दर्जेदार आरोग्य सुविधा मिळतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.प्रवीण परदेशी यावेळी म्हणाले, पालकमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त भूमिपूजनाची भेट मिळाली आहे. ३ वर्षात या जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम पूर्ण होणार आहे.असे त्यांनी सांगितले. आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर म्हणाले,राज्यात १ जिल्ह्यात सुसज्ज रुग्णालये बांधण्यात येत आहे. ३६२ कोटी रुपयांचा निधी डॉ. परदेशी यांनी एशियन विकास बँकेकडून रुग्णालयाच्या बांधकामा साठी उपलब्ध करून दिल्याचे सांगितले.


# मुंबईकरांचा प्रवास सुखकर करणारा सागरी किनारा मार्ग

आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मुंबई शहरातील धकाधकीच्या जीवनात वेळ आणि इंधन बचतीला आत्यंतिक महत्त्व आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या सागरी किनारा मार्ग (दक्षिण) ची एक बाजू वाहतुकीसाठी खुली होत असून वेळ आणि इंधन बचतीबरोबरच वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी होऊन मुंबईकरांचा प्रवास सुखकर करण्यामध्ये हा मार्ग महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार आहे.

देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळख असलेले मुंबई हे भारतातील आंतरराष्ट्रीय दर्जाचे एक प्रमुख शहर आहे. दक्षिण मुंबईतील परिसर व्यापार उदिमाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानला जातो. सात बेटांनी तयार झालेल्या मुंबईचा भौगोलिक विस्तार उत्तर दक्षिण असा पसरलेला असल्याने येथील देशाच्या मुख्य भागाशी जोडलेले दोन मुख्य रस्ते देखील उत्तर दक्षिण असेच बांधलेले होते. साहजिकच या रस्त्यांवर वाहतूक कोंडी ही नित्याची बाब असे. तथापि मागील काही वर्षांत या रस्त्यांना पूरक असे नवीन रस्ते तयार होत असल्याने रहदारीची ही जटील समस्या कमी होऊ लागली आहे. नुकत्याच सुरू झालेल्या 'अटल सेतू" नंतर आता सोमवारी वाहतुकीसाठी खुला होत असलेला मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

प्रकल्पामुळे होणारे फायदे

सागरी किनारी रस्त्यामुळे अंदाजे ७७ टक्के वेळेची बचत होणार असून इंधनामध्ये ३४ टक्के बचत होईल. इंधन बचतीमुळे प्रती वर्षी विदेशी चलनाची देखील मोठ्या प्रमाणात बचत होईल. ध्वनी आणि वायू प्रदूषण कमी होईल. सुमारे ७० हेक्टर हरितक्षेत्र निर्मितीमुळे प्रदूषण कमी होण्यास मदत होऊन



मुंबईकरांचे जीवनमान सुधारेल. या हरितक्षेत्रात सायकल ट्रॅक, सार्वजनिक उद्याने, जॉगिंग ट्रॅक, खुले प्रेक्षागृह आदी प्रस्तावित आहेत. या रस्त्यामुळे इतर मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल आणि सुरक्षित व जलद प्रवास करता येईल. मुंबईकरांना सागर किनारी अतिरिक्त प्रोमीनेड उपलब्ध होईल.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण) हा दक्षिण मुंबईतील प्रिन्सेस स्ट्रीट फ्लायओव्हर ते वांद्रे वरळी सी लिंकच्या वरळी टोकापर्यंत असणार आहे. या रस्त्याची लांबी १०.५८ कि.मी. असून मार्गिकांची रस्त्यावरील संख्या दोन्ही बाजूला प्रत्येकी चार असेल. तर बोगद्यांमध्ये ती दोन्ही बाजूला प्रत्येकी तीन असेल. भराव टाकून बनविलेल्या रस्त्यांची लांबी ४.३५ कि.मी. असून पुलांची एकूण लांबी २.१९कि.मी.आहे. या मार्गातील मलबार हिल टेकडीच्या खालील दुहेरी बोगद्यांची लांबी प्रत्येकी २.०७२ कि.मी. असून त्याचा अंतर्गत व्यास ११ मीटर आहे. याचे एकूण भरावक्षेत्र १११हेक्टर इतके असून तीन ठिकाणी आंतरबदल असतील ज्यांची लांबी १५.६६ कि.मी. इतकी आहे. ७.५ कि.मी. लांबीचे नवीन पदपथ असून बस वाहतूकीसाठी समर्पित मार्गिका ठेवण्यात आली आहे. समुद्री लाटांपासून बचावासाठी ७.४७ कि.मी. लांबीची सागरी तटरक्षक भिंत असणार आहे. या प्रकल्पात अमरसन्स, हाजी अली, वरळी डेअरी, थडाणी जंक्शन, वरळी येथे पार्किंगची सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे.

हा प्रकल्प मे २०२४ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर असून २५ फेब्रुवारी पर्यंत याची भौतिक प्रगती ८५.९१ टक्के तर आर्थिक प्रगती ८१.१९ टक्के इतकी झाली आहे. बोगदा खणन काम १०० टक्के पूर्ण झाले असून पुन: प्रापणाचे (रिक्लेमेशन) चे काम ९८ टक्के पूर्ण झाले आहे. समुद्रभिंत उभारण्याचे काम देखील पूर्णत्वास आले असून आंतरबदल ८७ टक्के तर पुलांचे काम ८५ टक्के पूर्ण झाले आहे.

**बोगद्याची वैशिष्ट्ये**

किनारा मार्गावरील पहिला बोगदा खणण्याची सुरुवात जानेवारी २०२१ मध्ये करण्यात आली होती. हा बोगदा जानेवारी २०२२ मध्ये पूर्ण झाला. दुसरा बोगदा खणण्याची सुरुवात एप्रिल २०२२ मध्ये करण्यात आली आणि हा बोगदा मे २०२३ मध्ये पूर्ण झाला. बोगद्याला ३७५ मि.मी. जाडीचे काँक्रीटचे अस्तर लावण्यात आलेले असून त्यावर अग्नीप्रतिबंधक उपाययोजनेअंतर्गत अग्नीरोधक फायरबोर्ड लावण्यात येत आहेत. भारतात प्रथमच सकार्डो वायुविजन प्रणालीची व्यवस्था करण्यात आली असून आपत्कालिन निर्वासनासाठी प्रत्येक ३०० मीटरवर छेद बोगदे आहेत. उपयोगिता सेवेसाठी बोगद्यांमध्ये युटीलिटी बॉक्सची व्यवस्था करण्यात आली आहे. दुहेरी बोगद्यासाठी अद्ययावत वाहतूक व्यवस्थापन नियंत्रण प्रणालीची व्यवस्था करण्यात येत आहे.

**प्रकल्पाचा खर्च**

मुंबई किनारी रस्त्यासाठी एकूण बांधकाम खर्च १३९८3.८3 कोटी रुपये अपेक्षित आहे. यामध्ये ९३८३.७४ कोटी रुपयांच्या प्रत्यक्ष बांधकाम खर्चाबरोबरच इतर अनुषंगिक खर्चाचा समावेश आहे.

**इतर वैशिष्ट्ये**

सागरी रस्ता प्रकल्पातील बोगदा खणणाऱ्या यंत्राने (टीबीएम) खोदण्यात येणारा भारतातील सर्वात मोठ्या व्यासाचा बोगदा (व्यास १२.१९ मी.) आहे. भारतात प्रथमच रस्ते वाहतूक बोगद्यामध्ये सकार्डो वायुविजन प्रणालीची योजना करण्यात आली आहे. तसेच भारतामध्ये प्रथमच एकलस्तंभ पाईलचा पाया बांधून पुलांची उभारणी करण्यात आली आहे. एकाच प्रकल्पामध्ये पुन:प्रापण करुन रस्ता, पूल, उन्नत मार्ग, उतरण मार्ग, आच्छादित बोगदा, समुद्र तसेच टेकडीखालून बोगदा, हरितक्षेत्राची निर्मिती करण्यात आली आहे. प्रकल्पातील प्रवाळांचे (कोरल) स्थलांतर व अस्तित्व टिकविण्याचे काम यशस्वीरित्या साध्य करण्यात आले आहे. एकूणच वेळ आणि इंधन बचतीबरोबरच वाहतूक कोंडी आणि प्रदूषण कमी करून मुंबईकरांचे दैनंदिन जीवनमान सुखकर करण्यामध्ये हा किनारा मार्ग महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, हे निश्चित.★★★

# जागतिक जल दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी पटवून दिले पाण्याचे महत्त्व

-: निसर्ग चक्र - टीम :-

**डोंबिवली -** जागतिक जल दिनानिमित्त डोंबिवली मधील शेकडो विद्यार्थ्यांनी काढलेल्या जलदिंडी व्दारे पाण्याचे महत्त्व पटवून देतानाच पाणी बचतीचा संदेशही देण्यात आला. टिळकनगर विद्यामंदिर,दक्षता मंडळ,श्री लक्ष्मी नारायण संस्था, उर्जा फाउंडेशन आणि स्वामी विवेकानंद सेवा मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने जलदिंडी काढण्यात आली.श्री लक्ष्मीनारायण संस्थेच्या सुरेखा जोशी, पर्यावरण दक्षता घ्या मेधा वैद्य, उज्ज्वला केतकर,रूपाली शाईवाले,उर्जा फाउंडेशन च्या स्नेहल दिक्षित,मेधा गोखले, विवेकानंद सेवा मंडळ यांच्या सचिव अनिल मोकल आणि सारिका परब यांनी उपस्थित राहून जलदिंडी उत्साहात संपन्न केली.

पालखी,झांजा, झेंडे पथके लक्षवेधीत होते.पाणी बचतीचे महत्त्व विषद करणारे फलक हातात झळकत होते.'बचत पाण्याची,गरज काळाची पाणी आडवा पाणी जिरवा ', स्वच्छ पाणी आदी घोषवाक्य देण्यात आली.पाण्याचे संवर्धन, संरक्षण तसेच नैसर्गिक जलस्त्रोताचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध राण्यांचे आवाहन करण्यात येत होते.

